आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१४ जुलै २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- कर्जमुक्ती योजनेचे निकष शिथिल केल्यानं अतिरीक्त २३ लाख शेतकऱ्यांना होणार फायदा, एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास करायला मंत्रिमंडळाची मान्यता

- राज्यातल्या धरणांमध्ये ४४ टक्के पाणीसाठा, १२ जिल्ह्यांमधे सरासरीच्या ७५ टक्क्यापेक्षा कमी पाऊस

- मोशी दुर्घटनेप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल, महापालिकेच्या अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस

आणि

- गुरुवारपासून पंढरपूरात २४ तास दर्शन सुविधा

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या निकषात सुधारणा करायलाही मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. शुक्रवारी विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी याची घोषणा केली होती. यामुळं १३ लाख शेतकऱ्यांना ५० हजाराच्या ऐवजी २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळेल. याशिवाय नियमित परतफेडीची अट रद्द केल्यानं २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळेल. राज्य मंत्रीमंडळाच्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड कॅप्सूल - - -**

*(एसटी महामंडळाच्या अतिरीक्त जागांचा पीपीपी तत्वावर विकास करायचा निर्णय राज्य मंत्रीमंडळानं आज घेतला आहे. तालुका आणि ग्रामीण भागातल्या २१३ ठिकाणांवरच्या जागांचा या माध्यमातून विकास होणार आहे. याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अधिक माहिती दिली*

***होल्ड- मुख्यमंत्री बाइट***

*पालघर जिल्ह्यात दापचरी इथं आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारायलाही राज्य मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. ५५८ हेक्टर जागेवर हा कृषी बाजार असेल. यामुळे शेतमालाचे मूल्यवर्धन होऊन चांगला दर मिळेल, असं पणनमंत्री जयकुमार रावल म्हणाले. यामुळं कृषी मालाची निर्यात वाढायला मदत होईल. काढणीनंतर होणाऱ्या नुकसानीत 15 ते 20 टक्के आणि शेतमाल वाहतूक तसंच हाताळणी खर्चातही 15 ते 20 टक्के बचत अपेक्षित असल्याचं त्यांनी सांगितलं. याद्वारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या १० हजार रोजगार निर्माण होण्याचीही शक्यता त्यांनी वर्तवली. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तांसाठी मुद्रीकरण धोरणही आज मंत्रिमंडळानं मंजूर केलं. अनेक वर्ष कारागृहात शिक्षा भोगल्यावर मुक्त झालेल्या मुक्तबंदी आणि परिविक्षाधीन यांना २६ हजाराच्या ऐवजी ५० हजार रुपये द्यायला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. किमान एक वर्ष कारागृहात राहिल्यावर निर्दोष मुक्तता झालेल्यांनाही याचा लाभ मिळेल.)*

**<><><><><>**

राज्यातल्या जलाशयांमध्ये सध्या एकूण साठवण क्षमतेच्या ४४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. कालपर्यंत राज्यातल्या ३ हजार ९ धरणांमध्ये सुमारे ६३३ टीमसी पाणीसाठा होता. हा साठा गेल्या वर्षी याच तारखेला नोंदवलेल्या ८४३ टीएमसी साठ्यापेक्षा बराच कमी आहे.

राज्यातल्या सहा महसूल विभागांपैकी नाशिक विभागात सर्वाधिक ८६ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला. छत्रपती संभाजीनगर -६६ टक्के, कोकण- ६२, पुणे- ५१, अमरावती- ४२, तर नागपूर विभागातल्या जलाशयांमधे ४० पाणीसाठा आहे. मोठ्या धरणांमध्ये त्यांच्या उपयुक्त साठवण क्षमतेच्या ४८ टक्के, मध्यम धरणांमध्ये ४२ टक्के, तर लहान जलाशयांमध्ये २९ टक्के पाणीसाठा आहे. राज्यातल्या प्रमुख जलाशयांमधे कोयना धरणात ४९ टक्के, जायकवाडी ३२ टक्के, उजनी ५० टक्के, गोसीखुर्द ३६ टक्के, तर खडकवासला धरण समूहात ४१ टक्के पाणीसाठा आहे.

**<><><><><>**

यंदाच्या पावसाळ्यात, कालपर्यंत राज्यात ३३४ मिलीमीटर पाऊस झाला आहे. राज्याच्या सामान्य सरासरीच्या तुलनेत तो ९६ टक्क्यांच्या आसपास असला तरी राज्यभरात पावसाचं वितरण समान नाही.

ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली आणि जालना या नऊ जिल्ह्यांमध्ये सरासरापेक्षा जास्त पाऊस झाला, तर नंदुरबारमध्ये सर्वात कमी, म्हणजे सरासरीच्या केवळ २९ टक्के पाऊस झाला. बारा जिल्ह्यांमध्ये ५० ते ७५ टक्के, तर अन्य १२ जिल्ह्यांमध्ये ७५ ते १०० टक्के पाऊस झाला.

राज्य मंत्रिमंडळापुढं आज झालेल्या सादरीकरणानुसार, ९६ लाख २१ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी पूर्ण झाली आहे. तेलबिया, सोयाबीन, कापसाची पेरणी सर्वाधिक क्षेत्रावर झाली आहे. काही ठिकाणी भाताची पुनर्लागवड सुरू आहे.

**<><><><><>**

शिक्षक पात्रता परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सांगितलं. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांना या परीक्षेची नवीन तारीख जाहीर करण्याची आणि फुटीला जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यासंदर्भात मुख्यमंत्री बोलत होते.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात पिंपरी-चिंचवड इथल्या मोशी कचरा डेपो दुर्घटना प्रकरणी पोलिसांनी एका खासगी ऊर्जा निर्मिती कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. डेपोमध्ये या कंपनीचं कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करणारं केंद्र आहे. मुसळधार पावसामुळे डेपोमधला कचऱ्याचा ढिगारा धोकादायक ठरू शकतो, याची माहिती असूनही, कंपनीने कोणतीही सुरक्षा विषयक उपाययोजना केली नव्हती, अशी महानगरपालिकेची तक्रार आहे.

दरम्यान, या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना होऊ नयेत, यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी राज्यसरकारने एक स्वतंत्र उच्च-स्तरीय समिती स्थापन केली आहे. ८ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसात कचऱ्याचा ढिगारा कोसळून इमारत खचल्यामुळे  झालेल्या या अपघातात नऊ जणांचा बळी गेला.

याप्रकरणी, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पर्यावरण अभियांत्रिकी विभागाच्या मुख्य आणि कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आल्याचं महापालिका प्रशासनानं सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक, एटीएसनं पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी संबंधित संशयित नेटवर्कविरोधात पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी कारवाई केली आहे. एटीएसने काल एकाच वेळी अनेक ठिकाणी छापेमारी करत काही संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कसलीही दुही किंवा मतभेद नाहीत, असं पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केलं आहे. सुनेत्रा पवार यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेल्या निवडीला आव्हान देण्याबाबत पक्षाचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंग यांनी लिहिलेलं पत्र निरर्थक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या मुद्द्यावर पक्षाचे सर्व नेते सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात गुरुवारपासून ३ ऑगस्टपर्यंत २४ तास दर्शन सुविधा उपलब्ध असेल. यात्रेचा कालावधी १५ ते २९ जुलै असा आहे. या कालावधीत सुमारे २० लाख भाविक येण्याचा अंदाज आहे, अशी माहिती मंदिर समितीनं दिली आहे. यात्रेदरम्यान सुमारे अडीच हजार मनुष्यबळ सेवेसाठी उपलब्ध राहणार आहे. मंदिरात मोबाईल आणि कॅमेरा न्यायला बंदी असल्यामुळे पाच ते सहा ठिकाणी मोबाईल लॉकर सुविधा उपलब्ध राहील.

<><><><><>

पंढरपूर इथे होणाऱ्या आषाढी एकादशी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम इथली संत सूरदास महाराज दिव्यांग वारी आज धाराशिव जिल्ह्यात कळंब इथे दाखल झाली. या दिंडीत १५ अंध वारकरी आणि त्यांचे ५ मदतनीस स्वयंसेवक सहभागी झाले आहेत.

<><><><><>

राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी तसंच १२ वीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. राज्यभरातून दहावीचे फक्त साडे २९ टक्के विद्यार्थी तर बारावी परीक्षेत सुमारे ३९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

<><><><><>

भारतीय क्रिकेट संघाच्या इंग्लंड दौऱ्यात एकदिवसीय सामन्यांची मालिका आज सुरु झाली. बर्मिंगहॅम इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या ४७ षटकात ८ बाद २५७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

'भारताच्या सर्जनशील अर्थव्यवस्थेसाठी मनुष्यबळाची सज्जता' या कार्यशाळेचं आयोजन पत्र सूचना कार्यालयानं नागपुरात केलं होतं. जागातिक ऑरेंज अर्थव्यवस्थेत ३ टक्के योगदान असलेल्या भारताचं पुढच्या १० वर्षात १२ ते १५ टक्के योगदान नेण्याचे उद्दिष्ट असून त्या दिशेने प्रयत्नशील असल्याचं प्रतिपादन इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. आशिष कुलकर्णी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**